भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# —: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :—

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक १९.०२.२०२० ते २३.०२.२०२०)

| अंक १४/२०२० | दिनांक १८.०२.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१२/०२/२०२० ते १८/०२/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १९/०२/२०२० ते २३/०२/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२/०२ | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | दिनांक | | १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ० | ० | ० | ० | ० |
| ३६.० | ३६.५ | ३६.५ | ३७.० | ३७.५ | ३८.० | ३८.० | कमाल तापमान (अं. से) | | ३७ | ३६ | ३५ | ३४ | ३४ |
| १९.५ | १९.० | १८.० | १८.५ | १८.० | १८.० | १७.० | किमान तापमान (अं. से) | | १९ | २० | १९ | १८ | १८ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ३ | १ | ३ | १ | १ |
| ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९१ | ९६ | ९१ | ९२ | ९१ | ९१ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ५७ | ६३ | ५९ | ५४ | ५५ |
| ५७ | २९ | २८ | २७ | २८ | २६ | २५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | २५ | २७ | ३० | २५ | २१ |
| १.२ | १.३ | १.५ | १.१ | १.३ | १.५ | १.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००४ | ००४ | ००५ | ००६ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | ईशान्ये कडून | पूर्वे कडून | ईशान्ये कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून |
| दक्षिण | ईशान्य | दक्षिण | पश्चिम | पश्चिम | दक्षिण | दक्षिण | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या आठवड्यात तापमानात ब-याच अंशी वाढ होण्याची शक्यता असुन हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | फुटवे | येत्या आठवड्यामध्ये तापमान वाढीची शक्यता असल्यामुळे पुर्नलागवड केलेल्या उन्हाळी भात शेतामध्ये सुरुवातीचे ८ ते १० दिवस पाण्याची पातळी २ ते ३ से.मी. ठेवावी. त्यानंतर ५ से.मी. पर्यंत वाढवावी.<br>भात पिकातील तण नियंत्रण करावे. लावणीनंतर एक महिना झालेल्या भात पिकास ४० कि. ग्रॅम प्रती हेक्टर (८७ कि.ग्रॅ. युरीया) याप्रमाणे नत्राचा पहिला हप्ता द्यावा. |
| कुळीथ व चवळी | शेंगा | चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मि.ली. डायमिथोएट प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| कडवा वाल | शेंगा | वाल पिकास पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थांमध्ये जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे. पिकाला फुलो-यात असताना आणि दाणे भरण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. ज्यादा पाण्यामुळे वालाची शाखिय वाढ होते व उत्पन्न घटते. |
| भुईमुग | फुलोरा ते आरा | भुईमुग पिक काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत असुन हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे उत्पन्न वाढते. |
| आंबा | फुलोरा ते फळधारणा | येत्या आठवड्यामध्ये तापामानात वाढ होण्याचा अंदाज असुन आंबा फळगळ नियंत्रणासाठी, ऊत्पन्न वाढविण्यासाठी व फळाची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराची असताना १% पोटॅशियम नायट्रेट्ची तीन वेळा फवारणी करावी.<br>येत्या आठवड्यामध्ये तापमान वाढीची शक्यता असल्यामुळे पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रती झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे.<br>मोहोर फुलण्याच्या अवस्थेत शक्यतो किटकनाशकाच्या फवारण्या टाळाव्यात. जेणेकरुन त्याचा परपरागीभवनावर परिणाम होणार नाही.<br>आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी ५ % हेक्झाकोनॅझोल ५ मिलि प्रती १० लिटर पाण्यात तसेच ८०% गंधक २० ग्रम प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>विद्यापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होऊन चांगली फळधारणा होण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती १९ लि. पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सदर २५ लि द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे.<br>जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी येणा-या मोहोरावर फुलकीडीचा (थ्रिप्स) प्रादुर्भाव आढळुन आल्यास अशा ठिकाणी फुलकिडींच्या नियंत्रणासाठी ४५ % स्पीनोसॅड २.५ मिलि प्रति १० लिटर पाण्यातुन संपुर्ण झाडावर फवारावे. |
| काजु | फळधारणा | काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ % ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| नारळ | फळधारणा | नारळावरील गेंड्या भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त माड साफ करुन सर्वात वरील पानांच्या बेचक्यात २% मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रम + ५० ग्रम वाळु याचे समप्रमाणात मिश्रण करुन भरावे. बागेमध्ये शेणखताच्या अळ्यांना मारण्यासाठी ५०% पा.मि. कार्बारिल भुकटी ४० ग्रम प्रती १० लि. पाण्यात मिसळुन फवारावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|